**सार्वजनिक रस्त्यावरील**
**प्रवेशद्वार / कमानीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः व्हीपीएम २०१७/प्र.क्र.४२१/पंरा-३**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४००००१
तारीख: : १६ एप्रिल, २०१८

<u>प्रस्तावना -</u>

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, यांनी जनहित याचिका क्र. ६७ / २०१५ मध्ये सार्वजनिक रस्त्यावर उभारलेल्या प्रवेशद्वार/कमानी यांच्या बांधकामाची बाब निदर्शनास आणली आहे. त्याअनुषंगाने सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक-**

राज्यातील ग्रामीण भागातील गावठाण हद्दीतील बांधकाम परवानगीचे अधिकार नगर रचना अधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेने ग्रामपंचायतींना आहेत. गावठाण हद्दीतील बांधकाम परवानगी करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ याच्या कलम २० च्या पोट कलम (४) अन्वये तयार केलेले महाराष्ट्र प्रादेशिक योजनांच्या संबंधातील प्रमाणीकृत विकास नियंत्रण व प्रवर्तन विनियम लागू करण्यात आले आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रारुप/अंतिम प्रादेशिक योजना लागू असल्याने गावठाण हद्दीबाहेरील बांधकाम परवानगीचे अधिकार नगर रचना अधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेने जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जाचा अधिकारी यांना आहे. गावठाण हद्दीबाहेरील बांधकाम परवानगी करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ लागू आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५३ मध्ये सार्वजनिक रस्ते व खुली जागा यावर अडथळे व अतिक्रमणे दूर करण्याबाबत तरतुदी आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५३ मधील पोट-कलम (२) अन्वये ग्रामपंचायतींना सार्वजनिक रस्त्यांवरील कोणत्याही स्वरूपाचे अतिक्रमण / अडथळा निष्कासित करण्याचे अधिकार असून त्यांचे कर्तव्य आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत

अधिनियमाच्या कलम ५३ मधील पोट-कलम (२-क) अन्वये ग्रामपंचायतीने अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यास कसूर केली तर जिल्हाधिका-यास स्वत: होऊन किंवा या बाबतीत करण्यात आलेल्या अर्जावरून त्या पोटकलमात तरतूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याचा अधिकार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणारा निधी हा प्राधान्याने गावाच्या मुलभूत गरजा-सुविधांवर खर्च करणे अपेक्षित आहे. अशा मुलभूत सुविधांचा अभाव असताना प्रवेशद्वार/कमानी बांधणे योग्य नाही. विशेषत: गावामध्ये स्मशानभूमि, अंतर्गत रस्ते, ग्रामपंचायत इमारत, अंगणवाडी इमारत, शाळा इमारत व या इमारतीमध्ये शौचालयासारख्या सुविधा पुरेशा नसताना प्रवेशद्वार/ कमानी बांधण्यावर सार्वजनिक निधी खर्च करु नये.

राज्य शासन/सार्वजनिक नियोजन प्राधिकरण/स्थानिक स्वराज्य संस्था यांना सार्वजनिक रस्त्यांवर प्रवेशद्वार किंवा कमानी बांधावयाची झाल्यास संबंधित रस्ता ज्या प्राधिकरणाचा आहे त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, राज्य महामार्ग अधिनियम,१९६५, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६, सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी निर्गमित कलेले आदेश व प्रचलित नियमांनुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने बांधकाम करता येईल. ज्या सार्वजनिक प्राधिकरणाने सार्वजनिक रस्त्यांवर प्रवेशद्वार किंवा कमानी बांधल्या आहेत त्यांची देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची राहील. सार्वजनिक रस्त्यांवर प्रवेशद्वार/ कमानी बांधण्याचा अधिकार खाजगी व्यक्ती / खाजगी संस्था यांना नाही.

वरील वस्तुस्थिती जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणण्यात यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१६१४५९५१६८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रा.अ.ताठरे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई.
३. मा. विधानसभा /मा. विधान परिषद सदस्य ( सर्व)
४. मा. राज्यपाल यांचे सचिव
५. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
६. मा.मंत्री ( ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
७. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
८. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
१०.विधी मंडळ ग्रंथालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती)
११.माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२.सर्व विभागीय आयुक्त
१३.सर्व जिल्हाधिकारी

१४.सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कर्यासन अधिकारी ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१६.सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक

१७.माहिती तंत्रज्ञान कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई

१८.निवडनस्ती, कार्यासन पंरा-३.